सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/२०२५/ 1167
दिनांक 21 APR 2025

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था.
अमरावती विभाग,अमरावती.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील SEBC/OBC/EWS संवर्गातील जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत ऑनलाईन बैठक दिनांक २१/४/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता.**

**संदर्भ :** १.या कार्यालयाचे पत्र क्र :-विकाअ/शिक्षण/२०२५/१०७८ दिनांक ९.४.२०२४
२.या कार्यालयाचे पत्र क्र :-विकाअ/शिक्षण/२०२५/११४५ दिनांक १६.४.२०२४

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील संचालनालया अंतर्गत येत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयाव्दारे तपासणी करण्यात आलेल्या आहेत. तथापि, गुणवत्ता यादी तपासणी करते वेळी ज्या SEBC/OBC/EWS विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे प्रवेशास या कार्यालयाव्दारे मान्यता देण्यात आलेली नाही.

आपल्या संस्थेतील ज्या SEBC/OBC/EWS विद्यार्थ्यांनी दिनांक ०७.०४.२०२५ पर्यंतचे कालावधीतील जात वैधता प्रमाणपत्र आपणास सादर केलेले असतील अशा विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र (मुळ प्रत व छायांकीत प्रत ) तसेच संबधित वर्षाची या कार्यालयाव्दारे प्रमाणित केलेली गुणवत्ता यादी या कार्यालयात **दिनांक १७.०४.२०२५ पर्यंत** सादर करण्याबाबत कळविलेले आहे.तथापी, ब-याचश्या संस्थांनी याबाबत कार्यवाही केलेली दिसुन येत नाही. तसेच या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये सदर प्रकरणी **दिनांक २१/४/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता** ऑनलाईन बैठक घेण्यात आलेली होती त्यामध्ये सदर विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास दोन दिवसाची मुदतवाढ देण्याबाबत कळविलेले असुन त्याप्रमाणे सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास दिनांक २३|/४/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे यापुढे याबाबत कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

**( मनोज म.अंधारे )**
**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत: प्रोग्रामर**, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.